
श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

कपिल गीता अध्याय(3.30)



वर्णन करने सांख्य योग का, और देने को ज्ञान ।
गुरु रूप में कपिल मुनि थे, देवहूति शिष्य समान।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
तृतीयं स्कंधः
॥ अथ त्रिं(म्)शोऽध्यायः ॥

कपिल उवाच

तस्यैतस्य जनो नूनं(न्), नायं(वँ) वेदोरुविक्रमम् ।
काल्यमानोऽपि बलिनो, वायोरिव घनावलिः ॥ 1॥

श्रीकपिलदेव म्हणतात- जसा वाऱ्याने उडून जाणारा मेघांचा समूह त्याची ताकद जाणत नाही, त्याचप्रमाणे हा जीवसुद्धा बलवान काळाच्या प्रेरणेने निरनिराळ्या अवस्था व योनींमध्ये भ्रमण करीत राहतो; परंतु त्याचा महान पराक्रम जाणत नाही.

यं(यँ) यमर्थमुपादत्ते, दुःखेन सुखहेतवे ।
तं(न्) तं(न्) धुनोति भगवान्, पुमाञ्छोचति यत्कृते ॥ 2॥

जीव सुखाच्या अभिलाषेने ज्या ज्या वस्तू मोठ्या कष्टाने मिळवितो, त्या त्या भगवान काळ नष्ट करतो. त्यामुळे त्याला अत्यंत दुःख होते.

यदध्रुवस्य देहस्य, सानुबन्धस्य दुर्मतिः ।

ध्रुवाणि मन्यते मोहाद्- गृहक्षेत्रवसूनि च ॥ 3॥

याचे कारण हेच आहे की, हा मंदमती जीव मोहामुळे आपले हे नाशवान शरीर व त्याच्याशी संबंधित घर, शेत, धन इत्यादी नित्य आहे, असे मानतो.

जन्तुर्वै भव एतस्मिन्, यां(यँ) यां(यँ) योनिमनुव्रजेत् ।

तस्यां(न्) तस्यां(म्) स लभते, निर्वृतिं(न्) न विरज्यते ॥ 4॥

या संसारात हा जीव ज्या ज्या योनीत जन्म घेतो, त्यातच आनंद मानू लागतो आणि त्यापासून विरक्त होत नाही.

नरकस्थोऽपि देहं(वँ) वै, न पुमां(म्)स्त्यक्तुमिच्छति ।

नारक्यां(न्) निर्वृतौ सत्यां(न्), देवमायाविमोहितः ॥ 5॥

हा भगवंतांच्या मायेने असा मोहित होतो की, कर्माप्रमाणे नरकातल्या योनीमध्ये जन्म घेऊनही तेथील विष्ठा आदी तुच्छ भोगांमध्येच सुख मानल्याकारणाने ती योनी सोडू इच्छित नाही.

आत्मजायासुतागार-पशुद्रविणबन्धुषु ।

निरूढमूलहृदय, आत्मानं(म्) बहु मन्यते ॥ 6॥

हा मूर्ख आपले शरीर, स्त्री, पुत्र, गृह, पशु, धन आणि बांधवांमध्ये आसक्त होऊन त्यांच्या संबंधात अनेक प्रकारचे मनोरथ करीत स्वतःला मोठा भाग्यशाली समजतो.

सन्दह्यमानसर्वाङ्ग, एषामुद्वहनाधिना ।

करोत्यविरतं(म्) मूढो, दुरितानि दुराशयः ॥ 7॥

त्यांच्या पालन-पोषणाच्या चिंतेने याचे संपूर्ण अंग काळजीने जळत असते, तरी दुर्बलपणामुळे हृदय धडधडीत झाल्यामुळे हा मूर्ख नेहमी त्यांच्यासाठी निरनिराळी पापे करीत राहतो.

आक्षिप्तात्मेन्द्रियः(स्) स्त्रीणा-मसतीनां(ञ्) च मायया ।

रहो रचितयाऽऽलापैः(श्), शिशूनां(ङ्) कलभाषिणाम् ॥ 8॥

गृहेषु कूटधर्मेषु, दुःखतन्त्रेष्वतन्द्रितः ।

कुर्वन् दुःखप्रतीकारं(म्), सुखवन्मन्यते गृही ॥ 9॥

कुलटा स्त्रियांनी एकांतात दाखविलेल्या कपटपूर्ण प्रेमामुळे आणि मुलांशी गोड गोड गोष्टी बोलण्यात मन आणि इंद्रिये गुंतल्याने, गृहस्थ घरातील दुःखप्रधान तुच्छ कर्मामध्ये लिप्त होऊन जातो. त्यावेळी माणूस होऊन जर त्याला एखादा दुःखाचा प्रतिकार करण्यात यश मिळाले तर तो त्यालाच सुखासारखे मानतो.

अर्थैरापादितैर्गुर्व्या, हिं(म्)सयेतस्ततश्च तान् ।

पुष्णाति येषां(म्) पोषेण, शेषभुग्यात्यधः(स्) स्वयम् ॥ 10॥

इथून तिथून भयानक हिंसावृत्तीने धनाचा संचय करून अशा लोकांचे पोषण करतो की ज्यांचे पोषण केल्यामुळे तो नरकात जातो. स्वतः तर त्यांच्या खाण्या-पिण्यातून उरलेले अन्न खाऊनच राहतो.

वार्तायां(लँ) लुप्यमानाया- मारब्धायां(म्) पुनः(फ्) पुनः ।

लोभाभिभूतो निः(स्)सत्त्वः(फ्), परार्थे कुरुते स्पृहाम् ॥ 11॥

वारंवार प्रयत्न करूनही जेव्हा याची उपजीविका चालत नाही, तेव्हा हा लोभाने अधीर होऊन दुसऱ्याच्या धनाची इच्छा करू लागतो.

कुटुम्बभरणाकल्पो, मन्दभाग्यो वृथोद्यमः ।

श्रिया विहीनः(ख्) कृपणो, ध्यायञ्छ्वसिति मूढधीः ॥ 12॥

जेव्हा दैवाने याचे कोणतेही प्रयत्न सफल होत नाहीत आणि हा मंदबुद्धी निर्धन होऊन कुटुंबाचे भरण-पोषण करण्यास असमर्थ होतो, तेव्हा अत्यंत दीन आणि चिंतातुर होऊन दीर्घ सुस्कारे सोडू लागतो.

एवं(म्) स्वभरणाकल्पं(न्), तत्कलत्रादयस्तथा ।

नाद्रियन्ते यथा पूर्वं(ङ्), कीनाशा इव गोजरम् ॥ 13॥

हा आपले पालन-पोषण करण्यास असमर्थ आहे असे पाहून ते स्त्री-पुत्रादी याचा पहिल्यासारखा आदर करीत नाहीत, जसे कंजूष शेतकरी म्हाताऱ्या बैलाची उपेक्षा करतात.

तत्राप्यजातनिर्वेदो, म्रियमाणः(स्) स्वयम्भृतैः ।

जरयोपात्तवैरूप्यो, मरणाभिमुखो गृहे ॥ 14॥

आस्तेऽवमत्योपन्यस्तं(ङ्), गृहपाल इवाहरन् ।

आमयाव्यप्रदीप्ताग्नि- रल्पाहारोऽल्पचेष्टितः ॥ 15॥

एवढे होऊनही त्याला वैराग्य येत नाही. ज्यांचे याने स्वतः पालन केले होते, तेच आता याचे पालन करतात. वृद्धावस्था आल्याकारणाने हा कुरूप होतो. शरीर रोगी बनते. जठराग्नी मंद होतो, भोजन आणि पुरुषार्थ दोन्हीही कमी होतात. तो मरणोन्मुख अवस्थेत घरी पडून राहतो आणि कुत्र्याप्रमाणे स्त्री-पुत्रादिकांनी अपमानपूर्वक दिलेले अन्न खाऊन उदरनिर्वाह करतो.

वायुनोत्क्रमतोत्तारः(ख्), कफसं(म्)रुद्धनाडिकः ।

कासश्वासकृतायासः(ख्), कण्ठे घुरघुरायते ॥ 16॥

मृत्युसमय जवळ आल्याकारणाने वाताचे उत्क्रमण होऊन डोळ्यांची बुबुळे बाहेर येतात, श्वासनलिका कफामुळे चोंदून जाते, खोकताना आणि श्वासोच्छ्वास करताना याला मोठे कष्ट होतात. तसेच कफ वाढल्याने कंठामध्ये घरघर होऊ लागते.

शयानः(फ्) परिशोचद्भिः(फ्), परिवीतः(स्) स्वबन्धुभिः ।

वाच्यमानोऽपि न ब्रूते, कालपाशवशं(ङ्) गतः ॥ 17॥

शोकाकुल नातलगांनी धरलेला हा मृतदेह मृत्युपाशात बांधला गेल्याने त्यांनी बोलूनही काही बोलत नाही.

एवं(ङ्) कुटुम्बभरणे, व्यापृतात्माजितेन्द्रियः ।

म्रियते रुदतां(म्) स्वाना- मुरुवेदनयास्तधीः ॥ 18॥

अशा प्रकारे जो मूर्ख मनुष्य इंद्रियांवर विजय न मिळविता नेहमी कुडबाचे पालन-पोषण करण्यातच व्यग्र राहतो, तो रडणाऱ्या स्वजनांच्या मध्ये अत्यंत वेदनांनी देहभान होऊन मृत्यूला प्राप्त होतो.

यमदूतौ तदा प्राप्तौ, भीमौ सरभसेक्षणौ ।

स दृष्ट्वा त्रस्तहृदयः(श्), शकृन्मूत्रं(वँ) विमुञ्चति ॥ 19॥

यावेळी त्याला नेण्यासाठी अतिभयंकर आणि रागाने डोळे लाल झालेले जे दोन यमदूत येतात, त्यांना बघून हा भयाने मल-मूत्र-त्याग करू लागतो.

यातनादेह आवृत्य, पाशैर्बद्ध्वा गले बलात् ।

नयतो दीर्घमध्वानं(न्), दण्ड्यं(म्) राजभटा यथा ॥ 20॥

ते यमदूत त्याला यातनादेहात टाकतात आणि नंतर शिपाई एखाद्या अपराध्याला घेऊन जातात, त्याप्रमाणे त्याच्या गळ्यात दोरी बांधून बळजबरीने यमलोकाच्या दीर्घ सफरीवर त्याला घेऊन जातात.

तयोर्निर्भिन्नहृदयस्- तर्जनैर्जातवेपथुः ।

पथि श्वभिर्भक्ष्यमाण, आर्तोऽघं(म्) स्वमनुस्मरन् ॥ 21॥

त्यांच्या दडदडवण्याने याचे हृदय विदीर्ण होते आणि शरीर थरथरा कापू लागते. वाटेत कधी त्याचे लचके तोडतात. त्यावेळी आपण केलेल्या पापांचे स्मरण करून तो व्याकूळ होतो.

क्षुत्तृट्परीतोऽर्कदवानलानिलैः(स्),

सन्तप्यमानः(फ्) पथि तप्तवालुके ।

कृच्छ्रेण पृष्ठे कशया च ताडितः(श्)-

चलत्यशक्तोऽपि निराश्रमोदके ॥ 22॥

तहान-भुकेने तो व्याकूळ होतो, तसेच घाम, आगीचा वणवा व गरम वाऱ्याची झळ यामुळे तो तप्त होऊन जातो. पाणी नाही, विश्रांती नाही, अशा स्थितीत तो तापलेल्या वाळूच्या मार्गातून जात असता एक पाऊलही पुढे टाकण्याची त्याला शक्ती नसते. यमदूत त्याच्या पाठीवर चाबकाचे फटकारे मारतात, तेव्हा मोठ्या कष्टाने तो चालू लागतो.

तत्र तत्र पतञ्छ्रान्तो, मूर्च्छितः(फ्) पुनरुत्थितः ।

पथा पापीयसा नीतस्-तमसा यमसादनम् ॥ 23॥

तो ठिकठिकाणी जमिनीवर पडतो, त्याला मूर्च्छा येते, तात्पुरती आल्यावर तो पुन्हा उठतो. अशा प्रकारे अत्यंत दुःखमय अंधाऱ्या मार्गाने, यमदूत त्याला यमपुरीला घेऊन जातात.

योजनानां(म्) सहस्राणि, नवतिं(न्) नव चाध्वनः ।

त्रिभिर्मुहूर्तैर्द्वाभ्यां(वँ) वा, नीतः(फ्) प्राप्नोति यातनाः ॥ 24॥

यमलोकाकडे जाणारा मार्ग नव्याण्णव हजार योजने आहे. इतका लांबचा मार्ग पाचसहा घटकांत चालत जाऊन तो नरकातील अनेक प्रकारच्या यातना भोगतो.

आदीपनं(म्) स्वगात्राणां(वँ), वेष्टयित्वोल्मुकादिभिः ।

आत्ममां(म्)सादनं(ङ्) क्वापि, स्वकृत्तं(म्) परतोऽपि वा ॥ 25॥

तेथे त्याच्या शरीराला धगधगत्या आगीत टाकून जाळले जाते, कधी स्वतः तर कधी दुसऱ्यांनी त्याचे तुकडे तुकडे करून त्याचेच मांस त्याला खाऊ घातले जाते.

जीवतश्चान्त्राभ्युद्धारः(श्), श्वगृध्रैर्यमसादने ।

सर्पवृश्चिकदं(म्)शाद्यैर्- दशद्भिश्चात्मवैशसम् ॥ 26॥

यमपुरीतील कुत्री अगर गिधाडे यांच्याकडून जिवंतपणीच त्याची आतडी बाहेर खेचली जातात. साप, विंचू आणि डास अशा चावणाऱ्या किंवा डंख मारणाऱ्या जीवांकडून त्याला पीडित केले जाते.

कृन्तनं(ञ्) चावयवशो, गजादिभ्यो भिदापनम् ।

पातनं(ङ्) गिरिशृङ्गेभ्यो, रोधनं(ञ्) चाम्बुगर्तयोः ॥ 27॥

शरीर कापून त्याचे तुकडे तुकडे केले जातात. मांस हत्तींकडून तुडविले जाते. पर्वतशिखरावरून खाली ढकलले जाते किंवा पाणी आणि खडकांत टाकून त्याला बुडवून टाकले जाते.

यास्तामिस्रान्धतामिस्रा, रौरवाद्याश्च यातनाः ।

भुङ्क्ते नरो वा नारी वा, मिथः(स्) सङ्गेन निर्मिताः ॥ 28॥

या सर्व यातना तसेच अशा प्रकारच्या तापिस, अंध-तामिस्र, रौरव इत्यादी नरकांच्या अनेक यातना, स्त्री असो वा पुरुष, त्या जीवाला परस्परांच्या संगाने होणाऱ्या पापांमुळे भोगाव्या लागतात.

अत्रैव नरकः(स्) स्वर्ग, इति मातः(फ्) प्रचक्षते ।

या यातना वै नारक्यं-स्ता इहाप्युपलक्षिताः ॥ 29॥

हे माते, काही लोकांचे असे म्हणणे आहे की, स्वर्ग आणि नरक तर याच लोकी आहेत. कारण ज्या नरकयातना आहेत, त्या येथेही दिसतात.

एवं(ङ्) कुटुम्बं(म्) बिभ्राण, उदरम्भर एव वा ।

विसृज्येहोभयं(म्) प्रेत्य, भुङ्क्ते तत्फलमीदृशम् ॥ 30॥

अशा प्रकारे अनेक कष्ट भोगून आपल्या कुटुंबाचे पालन करणारा किंवा फक्त आपलेच पोट भरणारा पुरुष ते कुटुंब आणि शरीर या दोघांनाही सोडून आपण केलेल्या पापांचे मेल्यानंतर असे फळ भोगतो.

एकः(फ्) प्रपद्यते ध्वान्तं(म्), हित्वेदं(म्) स्वकलेवरम् ।

कुशलेतरपाथेयो, भूतद्रोहेण यद्भृतम् ॥ 31॥

आपले शरीर येथेच सोडून देऊन प्राण्यांचा द्वेष केल्याने एकत्रितपणे केलेली पापरूप शिदोरी बरोबर घेऊन तो एकटाच नरकात जातो.

दैवेनासादितं(न्) तस्य, शमलं(न्) निरये पुमान् ।

भुङ्क्ते कुटुम्बपोषस्य, हृतवित्त इवातुरः ॥ 32॥

मनुष्य आपल्या कुटुंबाचे पोषण करण्यासाठी जे पाप करतो, त्याचे देवाने दिलेले अनिष्ट फळ तो नरकात जाऊन भोगतो. त्यावेळी तो इतका व्याकुळ होतो की, जणू त्याचे सर्वस्व लुटले गेले आहे.

केवलेन ह्यधर्मेण, कुटुम्बभरणोत्सुकः ।

याति जीवोऽन्धतामिस्रं(ञ्), चरमं(न्) तमसः(फ्) पदम् ॥ 33॥

जो मनुष्य फक्त पापकर्मे करूनच आपल्या कुटुंबाचे पालन-पोषण करण्यात व्यस्त राहतो, तो नरकामधील सर्वांत कष्टद स्थान असलेल्या अंधतामिस्र नरकात जातो.

अधस्तान्नरलोकस्य, यावतीर्यातनादयः ।

क्रमशः(स्) समनुक्रम्य, पुनरत्राव्रजेच्छुचिः ॥ 34॥

मनुष्यजन्म मिळण्यापूर्वी जितक्या यातना भोगाव्या लागतात तसेच डुक्कर-कुत्रा इत्यादी योनींमध्ये जितके कष्ट आहेत, ते सर्व क्रमाक्रमाने भोगून शुद्ध झाल्यानंतर पुन्हा मनुष्य योनीमध्ये त्याचा जन्म होतो

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्) तृतीयस्कन्धे

कापिलेयोपाख्याने कर्मविपाको नामत्रिं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥